# पडद्यामागचे कलाकार (!)

**डॉ. मनोज भाटवडेकर**

**अर्पिताच्या ई. ई. जी. मध्ये बिघाड होता तिला उपचारांची गरज होती. पण तिच्या आजी-आजोबांची आधुनिक उपचारांबद्दलची मतं विचित्र होती आणि ते ती लादू पाहात होते.**

नेहमी उपचारांसाठी येणाऱ्या अर्पिताच्या आईचा चेहरा आज जास्तच संत्रस्त वाटत होता. अर्पिताला उपचारांसाठी येऊन खरं म्हणजे एक महिना झाला होता. तिच्यात थोडीफार सुधारणाही सुरू झाली होती. तिची समस्या थोडीशी अशी होती- ती यंदा पहिलीत गेली होती. तिच्या शिक्षकांच्या मते तिचं वागणं चंचल होतं. एका जागी स्थिर न बसणं, इतर मुलांना त्रास देणं, अभ्यासात लक्ष न लागणं अशा तक्रारी शाळेतून आल्या होत्या. तिचं हे वागणं घरीही जाणवत होतंच. तिच्या मेंदूच्या कार्यांची तपासणी केल्यावरं असं लक्षात आलं होतं की तिच्या ई. ई. जी. मध्ये (मेंदूचा विद्युत आलेख) काही बिघाड आहे, ज्यामुळे तिचा चंचलपणा निर्माण होत होता. हे निदान झाल्यावर तिला औषधोपचार सुरू झाले होते. एकंदरीत तिच्या या वागण्याला प्रतिसाद म्हणून तिची आई खूप चिडचिडी झाली होती. अर्पिताशी कसं वागावं, तिच्याशी वागताना संयम कसा ठेवावा याबाबतचं मार्गदर्शन तिच्या आईला देण्यात आलं होतं. शिवाय अभ्यासात तिची प्रगती व्हावी यासाठी तिला सुधारणात्मक शिक्षण (Remedial teaching) सुरू करण्यात आलं होतं. या उपाययोजनांमुळे अर्पितामध्ये सुधारणा व्हायला सुरुवात झाली होती. अर्पिताच्या आईची चिडचिडही कमी होत होती. पण आज पुन्हा त्यांच्या चेहऱ्यावर त्रागा दिसत होता.

''मला माहीत आहे. तुम्हीही सांगितलंय, तिला एवढ्यातेवढ्यासाठी मारू नका. पण आज माझ्या ताबा सुटला डॉक्टर. आज मी तिला खूप मारलंय. मी एकटीच आहे का घरात? घरातल्या इतर माणसांनी मला सहकार्य नको का करायला? तुम्हाला माहीत आहे, आम्ही सगळे एकत्र राहतो. अर्पिताला उपचारासाठी बालकपालक केंद्रांत घेऊन जाणं, रेमेडिअल टीचरकडे घेऊन जाणं यामध्ये माझा बराच वेळ खर्च होतो. निनादचं- माझ्या धाकट्या मुलाचंही करावं लागतं. तो आता दोन वर्षांचा आहे. त्याच्यावरही लक्ष ठेवावं लागतं. माझे मिस्टर महिन्यातले दहा दिवस ऑफिसच्या कामानिमित्त बाहेरगावी असतात. त्यांचं संपूर्ण सहकार्य मला आहे. ते इथे असतात तेव्हा प्रत्येक बाबतीत मला मदत करतात. पण माझे सासूसासरे माझी ही ओढाताण समजू शकत नाहीत. एकतर अर्पिताच्या जन्मानंतर त्यांनी मला नोकरी सोडायला लावली. ते मी एकवेळ स्वीकारलं; कारण म्हटलं, मुलीकडे आपल्याला नीट लक्ष देता येईल. पण आता सगळ्या गोष्टी खुशाल माझ्यावर ढकलून ही दोघं मोकळी होतात. मी एकटी काय काय करणार?''

'आज काय झालं? काही विशेष घडलं का?'

''अहो, हे नेहमीच होतं. सध्या माझे मिस्टर बाहेरगावी गेलेत. काल संध्याकाळी अर्पिताला घेऊन मी रेमेडियल टीचरकडे गेले होते. निनाद त्यावेळी चांगला दोन-अडीच तास झोपतो. काल तो नेमका मी घरी नसताना उठला. मग त्याला दूध देणं, त्याची शी-शू काढणं हे सगळं त्याच्या आजीला करावं लागलं. घरी आल्यावर त्यांनी तणतणायला सुरुवात केली.

'मला किती त्रास झाला' म्हणून कांगावा केला. मी ते सगळं निमूटपणे ऐकून घेतलं. आज तुमच्याकडे अर्पिताला आणायची होती. तर सासूबाई लगेच म्हणाल्या- आज जायलाच पाहिजे का? पुन्हा तुझा मुलगा उठला तर काय करायचं? मी त्यांना पटकन बोलून गेले- माझा मुलगा आहे तसा तुमचा नातू नाहीये का तो? तर माझे सासरे मधे पडले. त्यांनी कायकाय बोलायला सुरुवात केली- तुम्ही मुलांना फारच लाडावता. अर्पिताला सारखंसारखं डॉक्टरांकडे घेऊन जाण्याची काही गरज नाहीये. तिला काहीही झालेलं नाहीये. मोठी होईल तशी सुधारेल. आपणही शिस्तीत वागावं लागतं वगैरे वगैरे. तेवढ्यात अर्पिताने मोठ्या आवाजात टीव्ही लावला. मी तिला तो बंद करायला सांगितला तर तिने मला कार्टून्स बघायची आहेत म्हणून हट्ट सुरू केला.' मग मात्र माझा ताबा सुटला. माझा सगळा राग मी तिच्यावर काढला. मी खूप मारलं तिला डॉक्टर.'' अर्पिताच्या आईला रडू अनावर झालं होतं.

'तुमच्या कुटुंबाबद्दल मला आणखी थोडी माहिती सांगा.'

''आधी माझे सासूसासरे माझ्या दिरांकडे राहायचे. पण तो ऑस्ट्रेलियाला गेल्यापासून ते आमच्याकडे असतात. माझा दीर माझ्या नवऱ्यापेक्षा जास्त हुशार आहे. त्यामुळे ते दोघे सतत त्याचे गोडवे गात असतात. माझे सासूसासरे पासष्टीच्या आत आहेत, हातीपायी धड आहेत, पूर्णपणे स्वावलंबी आहेत. त्यांची एकही गोष्ट मला करावी लागत नाही. मी शक्यतो एकही काम त्यांच्यावर पडू देत नाही. पण दोन मुलं आणि त्यात अर्पिताचा हा प्रॉब्लेम- काही वेळा त्यांच्यावर एखादं काम करायची वेळ येते. पण माझा त्याला इलाज नसतो. डॉक्टर, मी बघितलं, त्यांचा एकंदरीत वैद्यकीय उपचार, आधुनिक शास्त्र- एकूणच आधुनिक काळाबरोबर येणाऱ्या सर्व गोष्टींना विरोध असतो. वॉशिंग मशीनमध्ये त्या आपले कपडे टाकत नाहीत. ते त्या स्वत: धुतात. आजारी पडल्या तर स्वत: कसलेतरी काढे करून घेतात. अर्पिताला तुमच्याकडे आणण्याला त्यांचा सक्त विरोध आहे. मलाही कधीकधी असं वाटायला लागतं की मी अर्पितासाठी हे उगाच करतेय की काय. तुम्ही सांगितलेली प्रत्येक गोष्ट मी त्यांच्या कानावर घालत असते. तिच्याशी कसं वागायला हवं हे मी त्यांना समजावून सांगितलं. पण त्यांना पटायला तर हवं ना?''

'तुम्ही म्हणालात, त्यांचा अर्पिताच्या उपचाराला विरोध असतो. म्हणजे नेमकं काय?'

''म्हणजे असं - औषधांबद्दल त्यांचं नाक मुरडून झालं. मला सांगून झालं - बघ हं, असल्या औषधांनी तिचा मेंदू कायमचा पांगळा होऊन जाईल. त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ते आधी बघ. पण त्या औषधांनी अर्पिताचा चंचलपणा कमी व्हायला लागला. तेव्हा त्यांना औषधांचं महत्त्व पटलं- आता त्याबद्दल बोलत नाहीत. पण एकूण त्यांच्या बोलण्याचा रोख असा असतो की ही तुमची फॅडं आहेत.

मुलांना आम्ही नाही का वाढलं? एवढ्यातेवढ्यासाठी डॉक्टरकडे कसलं न्यायचं? मूल आहे तेव्हा ते करणारच मस्ती– दोन धपाटे घातले की सरळ येतात पोरं– असले त्यांचे सिद्धांत आहेत डॉक्टर. त्यामुळे होतं काय की तुम्ही सांगितलेल्या गोष्टी मी घरी अमलात आणायला पाहते त्यांच्यावर ही दोघं बोळाचं फिरवतातं. तिला सारखं 'वेडी, वेडी' म्हणून चिडवतात. हे योग्य आहे का डॉक्टर? मी त्यांना यावर सांगितलं तर म्हणतात, मग कशाला नेतेस तिला वेड्यांच्या डॉक्टरकडे? मला वाटायला लागलंय की हे सगळं मी सोडून द्यावं. अर्पिताचं जे व्हायचं असेल ते होईल.''

अर्पिताचे आजीआजोबा हे मुद्दाम तिचं नुकसान व्हावं म्हणून हे करत असतील? तशी शक्यता कमी आहे. त्यांची स्वत:ची म्हणून काही मतं आहेत. त्याहीपेक्षा मोठा त्यांचा अहंकार आहे. अहंकारापोटी आमचीच मतं बरोबर असा त्यांचा आग्रह आहे. हा अहंकार न दुखावता काही गोष्टी त्यांच्या गळी उतरवायला हव्या आहेत. यासाठी त्यांच्याबरोबरही उपचारात्मक चर्चा होणं आवश्यक आहे. त्यांनी पडद्यामागे राहून चालणार नाही. ते जर यायला कुरकुरत असतील तर बालकपालक मार्गदर्शन केंद्राच्या समाजसेविका त्यांच्या घरी जाऊन त्यांना भेटतील. महंमद आणि डोंगर यांची भेट होणं महत्वाचं – कुणी कुणापर्यंत यायचं हा मुद्दा तसा गौण आहे !

**आपलं महानगर , दि. १४–९–१९९९**
**काही बोलायाचे आहे**